**नियमित फौ. ख. क्र.४७/२०२३**
**सरकार -वि.- प्रशांत मेश्राम**
**नि.क्र. ८.**

साक्षीदाराला आज व्हीडीओ कॉन्फरेंसीग द्वारे गुगल मीटींग नं. xei-sdtr-fms या द्वारे हजर करण्यात आले. आरोपी व त्यांचे वकील श्री हुंगे हे हजर आहेत. त्यांच्या समक्ष साक्षीदाराचा पुरावा सुरु करण्यात आला.

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - जयपालसिंग नाथेसिंग गिरासे,
वय ४४ वर्षे, व्यवसाय – पोलीस निरीक्षक,
राहणार – पोलीस स्टेशन मानपाडा, ता. जि. ठाणे

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. दिनांक २५.०५.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. मी त्यादिवशी पोलीस स्टेशनला हजर असताना मुखबीरव्दारे खबर मिळाली की, एक टिप्पर विना परवाना रेती घेऊन जाणार आहे. त्यानंतर मी दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९** देण्यात येते. त्यानंतर आम्ही पंचांसह टि पॉईंट राष्ट्रीय महामार्ग ३५९-डी वर नाकाबंदी केली. तेथे एक टिप्पर येताना दिसला, त्याला थांबवून त्याचे चालकाकडे विचारपूस केली व टिप्परची पाहणी केली. त्या टिप्परचा क्र. एम.एच.४०-बी.एल.३३७४ असा होता. त्या टिप्परच्या पाहणीच्या दरम्यान त्यामध्ये ६ ब्रास रेती आढळून आली. चालकाला परवान्याबाबत विचारता त्याने नकार दिला. त्यानंतर मी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला घटनास्थळा वजा जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०** देण्यात येते. त्यानंतर ट्रक घेऊन मी पोलीस स्टेशनला आलो व फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यातील

मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.११** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, रेड कामी जाताना स्टेशन डायरीला केली जाते. मी ती नोंद दोषारोप पत्रासोबत आहे किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा पोलीस स्टेशनला बसून तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी टि पॉईंट वर वाहतुक ड्युटीवर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी केसेसचा टार्गेट पुर्ण करण्यासाठी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १३.०२.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.